

## उद्योगविश्व



गिक वसाहतीतील फोक्सवॅगन कंपनीच्या वतीने डॉ. चाको यांच्या हस्ते 'आयएमसीएआरईएस' पुणेचे बालगृहातील मुलांसाठी स्कूल बसची चावी प्रदान

## न कंपनीकडून स्कूल बस भेट

तीतील स्कूलबसची चावी प्रदान केली. ही बस सर्व

# कंपन्यांचा ओढा ग्रामीण विद्यार्थ्यांकडे

**मिलिंद संगई,** सकाळ वृत्तसेवा

**बारामती :** ग्रामीण भागातही कुशल मनुष्यबळ उपलब्ध आहे, याची जाणीव आता सर्वच मोठ्या कंपन्यांना होऊ लागल्याने या परिसरातील अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थ्यांना पदवी मिळविण्याअगोदरच नोकरी मिळू लागली आहे. सिव्हिल इंजिनिअरिंगसारख्या ठराविक ट्रेडमध्ये तर मनुष्यबळच उपलब्ध होत नसल्याची मोठ्या बांधकाम व्यावसायिकांची तक्रार असून, या कालावधीत हा कोर्स केलेल्यांना नोकरीच्या उत्तम संधी प्राप्त होत आहेत. आयटीआय किंवा डिप्लोमा व डिग्री मिळविणाऱ्या युवकांना त्यांच्या हातात पदवी पडण्याअगोदरच नोकरीचे पत्र असते, हा बदल परिस्थिती बदलत असल्याचे निदर्शक आहे. 'कॅंपस इंटरव्ह्यू' हा आता ग्रामीण भागातही युवकांच्या दृष्टीने परवलीचा शब्द बनू पाहत आहे.

आजही दहावीनंतर अभियांत्रिकी क्षेत्राकडे युवकांचा ओढा अधिक आहे. या क्षेत्रामध्ये असलेल्या युवकांना नोकरीची चिंता करण्याचे आता कारणच उरले नाही. या उलट त्यांना नोकरी निवडण्यामध्ये 'चॉईस' निर्माण झाला आहे. गेल्या दहा वर्षांत ग्रामीण भागातही बदललेली परिस्थिती युवकांच्या पथ्यावरच पडलेली आहे, असे दिसते आहे.

### फिनिशिंग कोर्स

**एखाद्या कंपनीला नेमके जे तंत्रज्ञ हवे आहेत, त्याच पद्धतीचे अल्पकालावधीचे शिक्षण विद्यार्थ्यांना देऊन त्या कंपनीमध्ये त्याला कुशल तंत्रज्ञ म्हणून पाठविण्याच्या अभ्यासक्रमास विद्या प्रतिष्ठानने प्रारंभ केला आहे. यामुळे विद्यार्थी व संबंधित कंपनी या दोघांचाही फायदा होतो आहे.**

### अनेक संस्थांतून सुरू झाले 'कॅंपस इंटरव्ह्यू'

आज बारामतीतील विद्या प्रतिष्ठानचे अभियांत्रिकी महाविद्यालय असो वा शिवनगर विद्या प्रसारक मंडळाचे महाविद्यालय किंवा माळेगावचे आयटीआय सेंटर. या सगळीकडेच आता नामांकित कंपन्या कुशल मनुष्यबळाच्या शोधार्थ येऊ लागल्या आहेत. केवळ शहरातच नाही; तर ग्रामीण भागातील युवकांमध्येही उत्तम कार्यक्षमता असते, ही बाब सिद्ध झाल्यानंतर शहरी युवकांइतकेच पगाराचे घसघशीत पॅकेज देत या कंपन्यांनी ग्रामीण भागातील मुलांना संधी देण्यास प्रारंभ केला आहे. 'विप्रो'पासून ते 'कॉग्निजेंट'पर्यंतच्या कंपन्या बारामतीतही 'कॅंपस इंटरव्ह्यू'साठी येत आहेत.

### नोकरीची चिंताच मिटली

महाविद्यालयाच्या शेवटच्या वर्षाला असताना परीक्षा होऊन पदवी हातात मिळण्यापूर्वीच नोकरीचे पत्र हातात मिळण्याची किमया घडू लागल्याने विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास तर दुणावला. शिवाय पदवीनंतर काय? याचे नैराश्यही दूर झाले. उलटपक्षी काही कंपन्यांमध्ये पगार कमी म्हणून विद्यार्थी नोकरी नाकारू लागल्याचे चित्र ग्रामीण भागातही पाहायला मिळू लागले आहे.

### शंभर टक्के प्लेसमेंट

शिवनगर विद्या प्रसारक मंडळाच्या सिव्हिल विभागात मुंबईच्या एका कंपनीने सिव्हिल इंजिनिअरिंगमध्ये संपूर्ण तुकडीलाच नोकरी देऊ केली. त्यांना अजूनही जागा भरायच्या होत्या; पण मुलेच उपलब्ध नाहीत, अशी परिस्थिती होती. हे चित्र खऱ्या अर्थाने दिलासादायक असून, ग्रामीण भागात शिक्षणाची गंगा आल्याने झालेला बदल दर्शविणारे आहे. मुलींनी या ट्रेडचा विचार करायला हरकत नाही. यंदा बारामती परिसरातील शिक्षणसंस्थांतून मुलांची चांगली प्लेसमेंट होत असून, बदलत्या काळात ही संख्या शंभर टक्क्यांवर जाईल, असा संस्थाचालकांना विश्वास वाटू लागला आहे.